नंदुदर्शनि
संस्थापक संपादक- स्व.विठ्ठलसिंग आप्पा राजपूत



जिल्ह्यात १ कोटी ८१ लाखाचा कालबाह्य दारुसह गांजासाठा न



नंदुरबार (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यात गुन्ह्यांमधील कालबाह्य झालेला दारु, गुटखा व गांजासाठा नष्ट करण्याची कार्यवाही करण्यात आली. जेसीबीच्या सहाय्याने दारुसाठ्यावर हातोडा फिरविण्यात आला. या कार्यवाहीत एक कोटी ८१ लाख ८० हजार ३६ रुपयांचा मुद्देमाल न्यायालयाच्या परवानगीने नष्ट केला आहे.

राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या सात कलमी कृती उपक्रमांतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील व सर्व पोलिस ठाण्यात असलेला गुन्ह्यांचा कालबाह्य मुद्देमाल न्यायालयाच्या परवानगी नाश करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. जिल्हा पोलिस अधिक्षक श्रवण एस यांनी दिलेल्या सुचनेनुसार पोलिस ठाण्यातील गुटखा, गांजा असा मुद्देमाल कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन नाश कर आला. नंदुरबार शहर, सारंगखेडा, अक्कलकुवा, शहादा, त विसरवाडी पोलिस ठाण्यांमध्ये विविध गुन्ह्यातील काल झालेला दारुसह गुटखा व गांजा नष्ट करण्यात आला दारुच्या बाटल्यावर जेसीबी फिरविण्यात आले. या कार एक कोटी ८१ लाख ८० हजार ३६ रुपयांचा मुद्देमाल करण्यात आला आहे.

Main Edition
Feb 08, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com